महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. 3328 दि.- १२/०९/२०१८

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक - १०/०९/२०१८ दिनांक - दुपारी ०३.३० वा.

**स्थळ** - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,
**श्री. भरत ब. जैन (सुराणा)**
तारा अपार्टमेंट, फ्लॅट नं.६,
मर्हषिनगर, गुलटेकडी
पुणे ४११०३७. } **अपिलार्थी**

**श्री. विक्रम काथवटे**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } **जनमाहिती अधिकारी तथा** वरिष्ठ आरोग्य निरिक्षक

### माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री.भरत ब.जैन (सुराणा) (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक ०८/०६/२०१८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक ०८/०६/२०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी दि.०१/०१/२०१८ ते दि.०१/०६/२०१८ पर्यंत प्रभाग क्र.२८ मध्ये झालेल्या विविध विकासकामा बाबतची माहिती विचारलेली होती

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| ०८/०६/२०१८ | ०८/०६/२०१८ | ०७/०७/२०१८ | ३०/०६/२०१८ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती अपुरी व दिशाभुल करणारी दिली असल्याने व दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक २१/०८/२०१८ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| २१/०८/२०१८ | २१/०८/२०१८ | अपिल अर्ज मुदतीत नाही. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.१०/०९/२०१८ रोजी दुपारी ०३.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी - उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील -**

| क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| मुद्दा क्र.१ | नक्षत्र उद्यान कटारिया शाळेजवळील नाला साफसफाई संदर्भात ठेकेदाराने बिलींगसाठी सादर केलेली एम बी ची प्रत व टेंडरची सर्व प्रत कॉपी मिळणेबाबत | नक्षत्र नाला साफसफाई कामाचे बिल ठेकेदारास तांत्रिक कारणास्तव अदा करण्यात आलेले नाही. |
| मुद्दा क्र.२ | प्रभाग क्र.२८ मध्ये विविध ठिकाणी रोडच्या कडेला लावलेला सोसायटी नामफलक रोड दिशा फलकाची | सदर कामाचे बिल ठेकेदारास अदा करण्यात आलेले आहे. तसेच प्रकरणातील टेंडर प्रत |

| | | |
|---|---|---|
| | लावलेल्या बोर्डचे ठेकेदारांनी सादर केलेल्या फोटो एमबी तसेच सादर केलेल्या बील व त्या संदर्भात असलेल्या टेंउरची सर्व प्रत देणे | कार्यालयाची नियोजीत वेळ घेवून आपणास कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येईल.प्रती पान र.रू.२/- भरल्यानंतर आपणास आवश्यक प्रती उपलब्ध करून देण्यात येईल |
| मुद्दा क्र.३ | मीनाताई ठाकरे औद्योगीक वसाहतीत केलेल्या ड्रेनेज कामाचे फोटो,एमबी तसेच सादर केलेले बील व टेंडर प्रक्रियेची प्रत देणे | सदर कामाचे बिल ठेकेदारास बिल अदा करण्यात आलेले आहे. तसेच प्रकरणातील टेंडर प्रत कार्यालयाची नियोजीत वेळ घेवून आपणास कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येईल.प्रती पान र.रू.२/- भरल्यानंतर आपणास आवश्यक प्रती उपलब्ध करून देण्यात येईल |

अपिलार्थी हे सदर माहितीसाठी वारंवार जनमाहिती अधिकारी व सहा.जनमाहिती अधिकारी यांचे संपर्कात असल्याने अपिलार्थी यांचा अपिल अर्ज मान्य करून अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक १०/०९/२०१८ रोजी दुपारी ०३.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.भरत ब.जैन (सुराणा) हे उपस्थित होते. सदर दिनांकास श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री.अजय खामकर हे प्रशिक्षणास असल्याने सुनावणीस अनुपस्थित होते.

अपिलार्थी श्री.भरत ब.जैन(सुराणा) यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जाची माहिती अपुरी व दिशाभुल करणारी दिली असल्याने व दिलेली माहिती समाधानकाररित्या न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

वरीलप्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'</u>**

- जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या मुद्दा क्र. १,२ व ३ इत्यादीबाबतची महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालयाकडील सद्यस्थितीत उपलब्ध असणारी माहिती पुढिल १५ दिवसात अपिलार्थी श्री.भरत ब.जैन(सुराणा) यांना विनामुल्य उपलब्ध करून देणेत यावी. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांची परिपूर्ण स्वरूपातील माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

12-09-18

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

<u>टिप -</u>

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे - ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत <u>www.punecorporation.org</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत -

१. श्री.भरत ब.जैन(सुराणा),तारा अपार्टमेट, फ्लॅट नं.६, महर्षिनगर, गुलटेकडी, पुणे - ४११०३७.
२. मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
३. श्री.अजय खामकर सहा.जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.